# युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२०

अमृत महोत्सवी वर्ष






self portrait of Bakre oil on canvas

मकर संक्रांत १९२३


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

वर्ष ७५ वे

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२०


**अमृत महोत्सवी वर्ष**

# युगवाणी


**संपादक**

प्रफुल्ल शिलेदार

**संपादक**
प्रफुल्ल शिलेदार

**मुखपृष्ठ :** सदानंद बाकरे

**ऋणनिर्देश**
*मुखपृष्ठ क्र. १, २ व ३ वरील तसेच आतील पानांवरील सदानंद बाकरे यांच्या चित्रांची आणि आणि शिल्पांची छायाचित्रे संग्राहक आणि चित्रकार मिलिंद लिंबेकर यांनी उपलब्ध करून दिली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. इतर छायाचित्रे आंतरजालावरून आणि लेखकांच्या व्यक्तिगत संग्रहातून साभार.*

**मुखपृष्ठावरील सुलेखन :** चंद्रमोहन कुलकर्णी

**संपादकीय पत्रव्यवहार**
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर – ४४० ०१५
ई–मेल : edityug@gmail.com

**प्रकाशक**
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर–४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२–२५२३९२९, २५५३७६७

**जाहिरात सहयोग :** प्रदीप दाते, वर्धा

**मुद्रितशोधन :** दीपक रंगारी

**अक्षरजुळणी व मुद्रण :**
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, नागपूर । भ्रमण : ९३२६९९९०१५

**युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :**
– युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी–विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
– युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
**'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'**
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
**A/c. No.: 04650100 005638**
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
↑ Fifth Character is 'ZERO'

– युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

**व्यवस्थापन :**
**वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :**
नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर–४४० ०१२ । भ्रमणभाष : **९४२३१०३३०१**

**प्रकाशनाची कालनियतता :** त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

**या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये**
**वार्षिक वर्गणी : २०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये**
**वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये भरणे गरजेचे आहे.**

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

# यु ग वा णी । ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२०

## अं त रं ग


- ***विशेष विभाग : भालचंद्र नेमाडे***
  भालचंद्र नेमाडे यांच्या काही कविता/**५**
  लेखकाजवळ शैलीसारखं सूक्ष्म शस्त्र असतं/**७**
  भालचंद्र नेमाडे यांची गोरख थोरात यांनी घेतलेली मुलाखत
  हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ – भाषिक पाहणी : रंजना नेमाडे/**२०**

- ***दृश्यकला : सदानंद बाकरे जन्मशताब्दी***
  शिल्पकार सदानंद बाकरे : दीपक घारे/**२४**
  सदानंद बाकरे : काही आठवणी : मिलिंद लिंबेकर/**२८**

- ***कथा***
  पाषाणभूल : निखिलेश चित्रे/**४१**

- ***वाचनवेध***
  साहित्यसमीक्षा आणि वाचक : कैलास प्रभाकर जोशी/**५४**

- ***भाषाभान : कुरमारी बोली***
  पूर्व विदर्भातील कुरमारी बोली : गजानन कोर्तलवार/**६६**
  दोन कुरमारी लोककथा आणि त्यांचे मराठी अनुवाद/**७३**

- **शेक्सपिअर : रोमिओ अँड जूलिएट**
  स्पर्शिकास्थित शेक्सपिअर : आशा राजवाडे/**७४**

- **विदर्भ साहित्य संघ कार्यवृत्त** /**७९**

# संपादकीय

**या** अंकाद्वारे युगवाणीच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता होत आहे. खरं तर या वर्षभरात ‘युगवाणी’च्या ७५ वर्षांच्या वाटचालीच्या अनुषंगाने काही कार्यक्रम करण्याचे योजले होते. मात्र जगभर सुरू असलेल्या कोरोना महामारीच्या थैमानामुळे आणि त्यामुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व अशा भयावह परिस्थितीमुळे प्रत्यक्ष कार्यक्रम घेणे शक्य झाले नाही याची रुखरुख मनास लागून राहील. या अवघड परिस्थितीतही या वर्षाचे सगळे अंक आम्ही थोड्या उशिराने का होईना पण प्रत्यक्ष छापील स्वरूपात काढून वाचकांच्या हाती सुपूर्द करू शकलो याचे समाधान आहे.

एखाद्या भाषेतील नियतकालिके हे त्या त्या भाषिक संस्कृतीची परिस्थिती दर्शविणारी सूचके असतात. नियतकालिके ही भाषेची जिवंत केंद्रे असतात. भाषेची जडणघडण ही लोकजीवनात घडत असते; पण ती टिपण्याचे, त्याच्या नोंदी ठेवण्याचे, त्याचे विश्लेषण करून समाजाला वारंवार सतर्क करण्याचे काम नियतकालिके करत असतात.

मराठी भाषकांची संख्या साधारणतः दहा ते बारा कोटी आहे. मराठीत विविध विषयांना वाहिलेल्या नियतकालिकांची आणि दिवाळीसारख्या विशेषांकांची संख्यादेखील भरपूर आहे. मात्र किती मराठी भाषकांमागे एक मराठी वाङ्मयीन नियतकालिक आहे, त्याचे वाचक किती आहेत, विविध अडचणींमधून वाट काढत किती वाङ्मयीन नियतकालिके नियमित निघू शकतात, या प्रश्नांची उत्तरे फारशी समाधानकारक नाहीत आणि ती आपल्या भाषेच्या वाङ्मयीन संस्कृतीवर प्रकाशझोत टाकतात.

आजमितीस महाराष्ट्रात सुमारे १२,८०० ग्रंथालये आहेत अशी माहिती आहे. महाराष्ट्रात एकूण ४३००० गावे आहेत. ‘गाव तेथे ग्रंथालय’ अशी शासनाची योजना आहे. म्हणजे अजून किमान तीस हजार गावांमध्ये ग्रंथालय उघडण्यास वाव आहे. प्रत्यक्षातल्या या सुमारे १३,००० ग्रंथालयांमध्ये मराठीतील वाङ्मयीन नियतकालिके अनेक कारणांनी पोहचू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. खरे तर यातील किमान अर्ध्या ग्रंथालयांमध्ये जर वाङ्मयीन नियतकालिके जाऊ लागली तर ते ग्रंथालयांच्या दृष्टीने, वाचनसंस्कृती वाढण्याच्या दृष्टीने, त्याचप्रमाणे वाङ्मयीन नियतकालिकांच्या परिस्थितीत सुधारणा होण्याच्या दृष्टीनेही संजीवक ठरू शकते. या दृष्टीने काही पावले उचलणे आज गरजेचे आहे.

मराठी भाषेवर प्रेम असणारे लोक नानाप्रकारे आपले भाषेवरील प्रेम व्यक्त करत असतात. ते त्या प्रेमापोटी वेगवेगळे कार्यक्रम करतात, योजना करतात, वेगवेगळी संमेलन आयोजित करतात. काही संमेलनांचा खर्च तर काही कोटी रुपयांच्या घरात जातो. एवढ्या मोठ्या खर्चातून दरवर्षी एखाद्या नियतकालिकाच्या आर्थिक स्थैर्यासाठी काही नेमके प्रयत्न केले जाऊ शकतात. वाङ्मयीन नियतकालिकांच्या संवर्धनाकरिता एक ठोस संरचना निर्माण होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने काही संस्थात्मक पावलेदेखील उचलणे आवश्यक आहे.

नियतकालिके ही आजच्या गुंतागुंतीच्या काळात अभिव्यक्तीचे महत्त्वाचे माध्यम आहे. नियतकालिके परिघावरच्या माणसाला बळ देऊ शकतात. साहित्यातील लोकशाहीकरणात नियतकालिकांचा मोठा वाटा आहे. आज जो बाजारवाद फोफावला आहे, भांडवलशाही आपल्या संपूर्ण जगण्यावर दबाव टाकते आहे, मूलतत्त्ववाद बोकाळतो आहे, या सगळ्यांविरुद्ध लढण्यात आणि माणूसपण टिकवण्यात नियतकालिके महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. नियतकालिके आपल्याला दाबून टाकू पाहणाऱ्या शक्तींविरुद्ध आवाज उठवू शकतात. भाषेच्या अंगावर धावून येणाऱ्या विनाशकारी लाटा थोपवून धरण्याची ताकद नियतकालिके बाळगून आहेत. या लाटा संस्कृतीवरही आघात करीत असतात. अशा वेळेस नियतकालिकांची अनन्य भूमिका असू शकते.

नियतकालिके विस्मृतीचा लोंढा अंगावर येत असताना स्मृती घट्ट धरून ठेवतात. स्मृती घट्ट धरून ठेवणे म्हणजे माणूस म्हणून जगणे, माणूस म्हणून आपले अस्तित्व शाबूत ठेवणे. नियतकालिके ही स्मृती शाबूत ठेवण्याची महत्त्वाची साधने आहेत हे लक्षात ठेवून आपण सगळ्यांनी याबाबत गंभीरपणे विचार आणि कृती करण्याची ही वेळ आहे, असे आवर्जून नोंदवावेसे वाटते.

**– प्रफुल्ल शिलेदार**

# भालचंद्र नेमाडे यांच्या कविता

## मांडो

मांड मांडिला मांड मांडिला संसार होऊ दे सुखाचा गे सोळा आणे सुखाचा
पैल्यांदा मांड दुसऱ्यांदा मांड इस्कटलं फिस्कटलं नव्यानं मांड बाई निकरानं मांड

नको करू पोवाडे नको भोगू भोवाडे संसाराचा डाव पुन्हा पुन्हा लाव
जितक्यांदा खचल तितक्यांदा रच नको खाऊ कच सोडू नको घर

घर आहे तिला डर नाही घरासाठी बाई असते बाईसाठी घर हे ध्यानी धर
सोडायचं सोड जोडायचं धर तोडू नको सांध पदराशी गाठ बांध

डोळ्यातले आसू दिसू नको दिऊ ओठावरचं हासू नासू दिऊ नको लेकी
कुंकूसुद्धा थुंकून ल्यावं असं असो सौभाग्य तरी रुसायचं टाळ सोसायचं पाळ

उपलाणी नको धावू सांभाळावी मांड कोणासाठी कशाला स्वतःसाठी नांद
काय मिळतं उधळूनबी ? दारूबाज रंडीबाज सगळ्यांना लागतेच घरातली बाज

त्याचं नाव त्याचीच जात त्याचंच गोत सातबारा वारसा, कूस तेवढी आपली
पहिल्यापास्नं चालत आलंय् बाईल म्हणजे बईल भाड्याचा काय करती ?

खरं सांगू ? नवरा म्हंजे गनमन भोवरा, आपण जाळी. लपेटून फिरवावं
बहिणाबाई म्हंतेच ना, तो असतो सुगरणीचा गन्यागंप्या. सुजण्यापेक्षा सजावं

रात्र असो वैरीण पहाट तर होतेच ना, तोवर दिवा तेवू द्यावा
माजू नये लाजावं विझू नये विझवावं वाटतं तितकं वाटून घ्यावं

घर कण्हतं आणि दार मिरवतं तरी घराला दार पाहिजेच बाई
कसं का असेना आडोसा तर असतो घर कधी दार वलांडतं का ?

बाहेर पडली एकटी बाई की सोदे वाटेवर उभेच असतात भिडतात
उचलून नेतात फाडून टाकतात भळभळते मुडदे पुरून टाकतात. रोजचं आहे हे

म्हणून तुला सांगत्ये ऐक बटकी हो पण भटकी नको होऊ पोरी
संसारामधि ऐस आपली उगीच भटकत फिरू नको

• • •

## चिमा काय कामाची?

कुठे दडली आमची चिमू छकुली – खाटेखाली नाहीऽ दाराआड नाही
चिमे, ये ग बाहेर कुठे आहेस? पडद्याआड? कोठ्यात की गोठ्यात?
धाब्यावर की परसात? अंगणात नाही पडवीत नाही, माळ्यावर?
तिथेही नाही. चिम्मा, ये ना ग बाहेर. आई काही बोलली त इतकं रुसावं का?
ये बरं आईजवळ तुला हव्वं ते देते. चिमूताईऽ चिम्म्याऽ तू नाहीच ओ देणार.
हट्टी आहेस मुलखाची – मायवर गेली म्हणतेच ना तुझी आजी.
कुठे लपली माझी लेक? गायी गायी हंबर, चिमाचा पहिला नंबर
माऊऽ माऊऽ ये गऽ, चिमा तुला दूदू देईल. भू भू जा, लाडकीला शोध
चिवचिव बघ ग दिसते का सोनी? जा रे कावकाव, बोलाव तुझ्या ताईला
कुठे आहेस ग रांडे, फुरंगटायच्या तुझ्या सगळ्या जागा झाल्या शोधून
सगळीकडे धुंडली कुठ्ठे कुठ्ठे नाही जीव कसा वारा झाला गऽ ये ना गऽ
जाशील कुठे मला सोडून, सापडेल माझी गुणाची बाय. येईल. येईल.

| | |
|---|---|
| बाय माझी छान छान | धरू तिचे दोन्ही कान – च्याऊ म्याऊ च्याऊ म्याऊ |
| ओऽ ओऽ रडू नको | मज्जा केली. उगी उगी. चला आता आंघोळ करू |
| न्हाऊ बाई न्हाऊ | तेल चोळून लावू |
| बशू बाई बशू | पाटावर बशू |
| पुशू बाई पुशू | ओलं आंग पुशू |
| हशू बाई हशू | खुदुखुदू हशू |

चिमाची आई, शेवटून म्हणा : नशू बाई नशू  कायमचं अशू
आईच तू शेवटी, वेडी नाही तर काय? सगळ्या आया अशा कशा ग?
हरवलेलं सापडेना तर स्वतःच हरवून जावं? आया म्हणजे माया
निर्दय सृष्टिचक्रानं मंतरलेल्या, कुशीत वंश वाढवण्याचं ओझं वाहणाऱ्या
तुझं लेकरू गेल्यानंतरच तुझ्यापाशी ज्यास्त असतं, हो ना?
कधी कधी वैतागून म्हणायचीस, मुलीची जात, जाईल भुर्, *चिमा काय कामाची?*

हे उलट म्हण सुलटं म्हण अर्थात काही फरक पडतो? अर्थात.

हा आत्ताचा भास आहे की ती जिवंत होती तो खरा भास होता?
तेव्हाचं तरी खरं असतं? ते नुस्तं असतं. नस्ता नसलेल्यांचं नसणं
असलेल्यांच्या असण्यापेक्षा ज्यास्त भासतं म्हणून जग फसतं.
ते काही असो, तू म्हणत राहा;
    नशू बाई नशू : कायमचं अशू
    अशू बाई अशू : पुढे कधी नशू

• • •